महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए. के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दुरध्वनी : ०२२ - २२०१६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


महत्वाचे /कालमर्यादा/ईमेलद्वारे
क्रमांक-तंशिप्र-१२१९/प्र.क्र.५७/प्रनिप्रा २५२                                  दि. १९ मार्च, २०१९

"परिपत्रक - ब"

**शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता नोंदणी प्रक्रियेबाबत**

विषयांकित प्रकरणी सर्व राज्यातील खाजगी विनाअनुदानित/अल्पसंख्यांक तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या महाविदयालयांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील पदव्युत्तर पदवी /पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया/प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेच्या प्रक्रियेसाठी प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या www.safalta.org या संकेतस्थळावर दि.०१/०४/२०१९ ते दि.३०/०४/२०१९ या कालावधीमध्ये संस्थेच्या लॉगीनद्वारे ऑनलाईन नोंदणी करुन खालील आवश्यक कागदपत्रे अपलोड/सादर करणे अनिवार्य आहे.

| अ. क्र. | व्यावसायिक अभ्यासक्रमाचे नाव | नोंदणीकरिता आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी (पदव्युत्तर पदवी/पदवी) | १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यतापत्र तसेच संबंधीत शिखर परिषदेची मान्यता (फार्मसी कॉन्सील ऑफ इंडिया, नवी दिल्ली/कॉन्सील ऑफ आर्कीटेक्चर, नवी दिल्ली)<br>२. शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता संबंधीत विद्यापीठाचे संलग्निकरण<br>३. संस्थेच्या मान्यतेबाबत शासन निर्णय<br>४. शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी अंतिम केलेल्या शुल्काबाबतची माहिती/निर्णय<br>५. संबंधीत संचालनालयाचे अंतिम मान्यतेचे पत्र<br>६. स्वायत्त संस्थांबाबत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे मान्यता पत्र<br>७. संस्थेस अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त असल्यास त्याबाबत शासनाचे पत्र/प्रमाणपत्र<br>८. संस्थेविरुद्ध कोणतेही न्यायालयीन प्रकरण किंवा गंभीर स्वरुपाची तक्रार प्रलंबित नसल्याबाबतचे लेखी हमीपत्र |
| २ | एचएमसीटी (पदव्युत्तर पदवी/पदवी) | |
| ३ | प्लानींग | |
| ४ | व्यवस्थापनशास्त्र | |
| ५ | एम.सी.ए. | |
| ६ | औषधनिर्माणशास्त्र (पदव्युत्तर पदवी/पदवी) | |
| ७ | वास्तुशास्त्र (पदव्युत्तर पदवी/पदवी) | |

उपरोक्त नमूद कालावधीमध्ये जे महाविद्यालय प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या ऑनलाईन पोर्टलद्वारे वरील नमूद कागदपत्रे सादर करु शकणार नाहित अशा संबंधीत महाविद्यालयांचा शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या प्रवेश प्रकियेमध्ये सहभाग करण्यात येणार नाही याची संबंधीत महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

(आ. ए. रायते,) भा.प्र.से.
सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य,
महाराष्ट्र राज्यातील सर्व खाजगी विनाअनुदानित/अल्पसंख्यांक व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये.

प्रत माहितीकरिता अग्रेषित,
मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

प्रत वरीलप्रमाणे आवश्यक कार्यवाहीकरिता तथा उक्त निर्देश/परिपत्रक संचालकांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याच्या विनंतीसह अग्रेषित,
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई .

प्रत,
१. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे स्वीय सहाय्यक.
२. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे स्वीय सहाय्यक.
३. मे. कल्प टेक्नॉलॉजीस प्रा. लि., पुणे यांना सदर परिपत्रकाप्रमाणे प्राधिकरणाचे संकेतस्थळ अद्ययावत करण्याच्या अनुषंगाने अग्रेषित.
४. निवडनस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.